## अनुसूचित क्षेत्र (पेसा) जाहिरात
## जिल्हा परिषद नंदुरबार
## माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र. ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि ०६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अंतर्गत करावयाची पद भरती.
## जाहिरात क्रमांक:- ०१/२०१९ दिनांक :- २७/१२/२०१९

------------------------------

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब मंत्रालय, मुंबई दि २१ डिसेंबर २०१९ च्या शासन निर्णयान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपिल क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दि ०६ जुलै २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्या संदर्भात निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने शासन निर्णयातील अ.क्र.१ (अ)(ब)(क)(ड)(इ) अंतर्गत अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांची संवर्ग निहाय संख्या निश्चीत करण्यांत येऊन सदर पदे दि ३१/१२/२०१९ पर्यंत अधिसंख्य पदावर वर्ग करुन त्याव्दारे जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत रिक्त होणारी खालील प्रमाणे संवर्गाची अनुसूचित जमातीच्या प्रवर्गाची रिक्त पदे **अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र धारक** उमेदवारांमधुन सेवा प्रवेश नियमानुसार सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई कडील शासन निर्णय दि १३ जुन २०१८ व ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुबंई दिनांक २४ डिसेंबर २०१९ मधील धोरणात्मक निर्णय व कार्यपध्दतीनुसार ऑफलाईन पध्दतीने भरती प्रक्रिया करण्याबाबत निर्देश आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत सरळसेवा भरतीसाठी संवर्ग निहाय पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यांत येत आहे.

**<u>अनुसूचित क्षेत्र (पेसा)-</u>**

मा.राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालयाकडील अधिसूचना दिनांक ०९ जून, २०१४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित क्षेत्र आलेल्या जिल्हयांमधील अनुसूचित क्षेत्रामधील सदर अधिसूचनेत निर्देशीत केलेल्या पदांपैकी सरळसेवेने भरावयाची पदे आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारांमधुन भरण्यात यावीत, असे निर्देश आहेत.

तसेच उक्त नमूद शासन निर्णयाव्यतिरिक्त सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१/प्र.क्र.२१३ए/१४/१६-ब, दिनांक ५ मार्च, २०१५, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.सकीर्ण-५०१६/प्र.क्र.४४४/आस्था-८, दिनांक २३ जुलै, २०१८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार नंदुरबार जिल्हयातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून ऑफलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

मा.राज्यपाल यांचे कार्यालयाकडील अधिसूचना दिनांक ९ जून, २०१४ करिता **"स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार"** याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी, आजोबा संबंधीत जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये २६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहे.

अनुसूचित क्षेत्रामधील निर्देशित रिक्त पदे ही स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारामधून भरणे बंधनकारक असल्यामुळे केंद्रीय विधी व न्याय मंत्रालय अधिसूचना क्र.जीएसआर/८७६(ई) दिनांक ०२ डिसेंबर, १९८५ मध्ये नमुद क्षेत्रातील नंदुरबार **जिल्हयातील अनुसूचित जमातीचे स्थानिक उमेदवारच** सदरच्या पदांच्या सरळसेवे भरतीसाठी अर्ज करतील.

**जिल्हा परिषद नंदुरबार अंतर्गत या जाहिरातीव्दारे भरावयाच्या संवर्ग निहाय पदांचा तपशील खालील प्रमाणे.**

| पदाचे नाव | अनुसूचित जमाती | समांतर आरक्षण |
|---|---|---|
| **अंगणवाडी पर्यवेक्षिका - सरळसेवा (पेसा क्षेत्र)** Supervisor (ICDS) (Nomination) | १ | सर्वसाधारण |

वरील पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**परिशिष्ठ-अ**

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व परिक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी ७वा वेतन आयोगानुसार | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | आंगणवाडी पर्यवेक्षिका सरळसेवा (पेसाक्षेत्र) | वेतन बँन्ड S-१३ **(३५४००-११२४०० )** | ज्या महिला उमेदवारांनी **मान्यता प्राप्त विद्यापिठाची स्नातक पदवी धारण केली असेल असे उमेदवार,** परंतु, मान्यता प्राप्त विद्यापिठाची समाजकार्य किंवा शिक्षण या विषयातील स्नातक पदवी धारण करीत असलेल्या उमेदवारांना अग्रक्रम दिला जाईल. | |

**अर्ज सादर करण्याचा कालावधी व लेखी परिक्षा वेळापत्रक :-**

| तपशील | दिनांक |
|---|---|
| **अर्ज दाखल करण्याचा कालावधी** | **दि. २८/१२/२०१९ ते दि ०६/०१/२०२० रोजी सायं. ५.३०वा. पर्यंत** |
| **लेखी परिक्षा दिनांक व वेळ** | **दि. १२/०१/२०२०<br>सकाळी ११.०० वा. ते १२.३०** |
| **अर्ज मिळण्याचे व सादर करावयाचे कार्यालय** | **जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)<br>महिला बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार, प्रशासकिय इमारत,<br>टोकरतलाव रोड, नंदुरबार-४२५४१२** |
| **लेखी परिक्षेसाठी पात्र/ अपात्र यादी प्रसिध्दीचा दिनांक** | **दि ०७/०१/२०२० रोजी संध्या. ०५.३० वा.** |
| **अपात्र ठरविण्यांत आलेल्या उमेदवारांना लेखी आक्षेप/ हरकती सादर करावयाचा कालावधी** | **दि ०८ / ०१/२०२० ते दि ०९/०१/२०२०** |
| **लेखी परिक्षेचे ओळखपत्र वाटप दिनांक - (उमेदवारांनी अर्ज सादर केलेल्या कार्यालयांस समक्ष स्वखर्चाने उपस्थित राहुन ओळखपत्र प्राप्त करणे आवश्यक आहे. यासाठी येण्या जाण्याचा कोणताही खर्च देण्यांत येणार नाही.)** | **दि १०/०१/२०२० ते परिक्षेच्या १ तास अगोदर पर्यंत.** ( उमेदवाराने अर्जावर व ओळखपत्रावर एक सारखा पासपोर्ट फोटो चिपकविणे आवश्यक आहे. ओळखपत्र प्राप्त करतांना पासपोर्ट फोटो सोबत आणावा.) |

**<u>परीक्षा शुल्क</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी | रु.२५०/- चा धनाकर्ष **किंवा** अर्ज समक्ष सादर करतांना रोखीने. |
| २ | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यक्ता नाही. | - |

**टिप** - अर्जासोबत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांचे नाव काढलेला राष्ट्रीयकृत बँकेचा रेखांकीत उपरोक्त नमुद रकमेचा धनाकर्ष **(डि.डी.)** नंदुरबार येथे देय असलेला अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील. सदर परिक्षाशुल्क नापरतावा असुन कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानतर काढण्यांत आलेले धनाकर्ष(डिडी) जोडलेले अर्ज स्विकारण्यांत येणार नाही. तसेच उमेदवारांस सदर पदासाठी महिला बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार येथे समक्ष अर्ज सादर करते वेळी देखील रोखीने परिक्षा शुल्क भरुन पावती प्राप्त करता येईल.